# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०१९**

गुन्हे शाखा, नवी मुंबई    दिनांक  ११.१०.२०१९

### गुन्हे शाखेने ''एम्फेटामाइन पावडर'' हा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या ३ आरोपींना केले गजाआड

दि. ११/१०/२०१९ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोना /२१२९ विनोद जाधव यांना कोपरखैरणे पोलीस ठाणे हद्दीत दोन इसम ''**एम्फेटामाइन** '' हा अंमली पदार्थ विक्री करण्यास येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्यावरून वपोनि रविंद्र बुधवंत यांनी व कार्यालयातील सपोनि निलेश माने, सपोनि पारासुर,पोना/२०६३ राजेश गाढवे, पोना १७७३ दिनेश मायदे, पोहवा/२९२ चौधरी, पोहवा/५७८ गायकवाड,पोहवा/८४९ शेख,पोहवा/१२०२ पिरजादे, पोना/२०५७ भालेराव, पोहवा/१३०१ उटगीकर, पोहवा/५३८ ईनामदार, मपोशि/१२५४२ ठाकूर, यांनी कोपरखैरणे पोलीस ठाणेच्या हद्दितील INDUS BANK, से. २०,कोपरखैरणे, नवी मुंबई येथे सापळा लावुन दोन इसम नामे १) गोकुळ गुरुनाथ गायकवाड, वय. २५ वर्षे, धंदा – रिक्षाचालक, रा. बारकुपाडा झोपडपट्टी, ज्योतीबा फुले आश्रमाच्या बाजुला, अंबरनाथ (पुर्व), जि. ठाणे, २) अमित राजकुमार शिरसाठ, वय. २९ वर्षे, धंदा– ड्रायव्हर, रा. शिवलोक अपार्टमेंट, रुम न. ३०२, रामनगर कुळगांव, बदलापुर पुर्व, जि. ठाणे यांना ताब्यात घेतले असता. त्याचे अंगझडतीत ६० ग्रॅम वजनाचा अंदाजे ३,००,०००/– रू. किंमतीचा ''**एम्फेटामाइन** '' हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने त्याला ताब्यात घेतले. सदर अंमली पदार्थ त्यांचेकडे कसा आला याबाबत अधिक चौकशी केली असता आरोपीनी सदरचा अंमली पदार्थ सागर जोशी रा. अंबरनाथ नावाच्या इसमाने दिल्याचे सांगितले असता अंबरनाथ येथिल एकवीरा हॉटेल येथे सापळा रचून ३) सागर परशुराम जोशी वय २७ धंदा– हेल्पर रा. मानेरागाव, जोशी वाडा, उल्हारनगर–४, ता. अंबरनाथ जि. ठाणे मोठया शिफातीने पकडले. त्याचे अंगझडतीत ६५ ग्रॅम वजनाचा अंदाजे ३,२५,०००/– रू.किंमतीचा ''**एम्फेटामाइन** '' हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने त्याला ताब्यात घेतले.सदर तिन्ही आरोपीकडून एकुण १२५ ग्रॅम ''**एम्फेटामाइन** '' हा अंमली पदार्थ व इतर मुददेमाल असा एकुण ६,५४,०५०/– रूपयाचा माल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपी क्रं.३ सागर जोशी हा फार्मा केमिकल्स कंपनी अंबरनाथ येथे हेल्पर म्हणून काम करतो. सदर आरोपी विरूध्द कोपरखैरणे पोलीस ठाणे गुरपं.३६९/१९ एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२,२९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि. १२/१०/२०१९ रोजी मा. न्यायालयात हजर केले असता त्याला दि. १४/१०/२०१९ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त, गुन्हेशाखा, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अजय कदम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा, नवी मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र बुधवंत, सपोनि विनया पारासुर,पोहवा/५३८ ईनामदार, पोहवा/२९२ चौधरी, पोहवा/१३०१ उटगीकर, पोहवा/५७८ गायकवाड, पोहवा/८४९ शेख, पोहवा/१२०२ पिरजादे, पोना/२१२९ जाधव, पोना/२०६३ गाढवे, पोना १७७३ मायदे, पोना/२०५७ भालेराव, मपोशि/१२५४२ सुप्रिया ठाकूर, यांनी केली असुन पुढील तपास सपोनि निलेश माने करीत आहेत.

———————————————